# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ६५ | किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

१९३८ : संतुरवादक शिवकुमार शर्मा यांचा जन्म.
१९४९ : भारतीय अतराळवीर राकेश शर्मा यांचा जन्म.
१९५७ : विज्ञानाचे नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ विल्यम वेन यांचा जन्म.
* जुन्या काळातील बालिका जरठ विवाहप्रश्नावर आधारित शारदा या गोविंद बल्लाळ देवलांच्या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

सेन्सेक्स ८३,८७८.१७ +३०१.९३ (०.३६%)
डॉलर ₹ ९०.१३

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३१ | १५ |
| दिल्ली | १८ | ०७ |
| मुंबई | ३३ | २० |
| नागपूर | २९ | १३ |
| पुणे | ३० | १५ |

## सुविचार

सकाळी सुरुवात सकारात्मक विचारांनी करा, दिवस सुंदर होईल.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०७ संध्या-६:०६

## सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४४,१३५/- २,७०,०००/-

## केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# पुण्यातील भाजपा-राष्ट्रवादीतील वाद दिल्लीत जाणार

## भाजपा नेत्यांनी केलेल्या टीकेनंतर अजित पवारांचा सूचक इशारा

वृत्तसंस्था । पुणे

**राज्यात महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या प्रचाराच्या निमित्ताने राष्ट्रवादी (अजित पवार) आणि भाजपामध्ये वादाची ठिणगी पडल्याची चर्चा आहे. कारण उपमुख्यमंत्री अजित पवारांनी पिंपरी चिंचवड महापालिकेबाबत बोलताना भाजपावर टीका केली होती. त्यांच्या या टिकेनंतर भाजपाच्या नेत्यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली. यातच अजित पवारांनी पुणे महापालिकेच्या जाहीरनाम्यात मोफत पीएमपी आणि मेट्रो सेवा देण्याची घोषणा केली. यावरून मंत्री चंद्रकांत पाटलांनी अजित पवारांवर टीका केली.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील अजित पवारांनी युती धर्म न पाळल्याचं म्हणत नाराजी व्यक्त केली.

तसेच भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांनी एका कार्यक्रमात बोलताना अजित पवारांना महायुतीत घेतल्याचा पश्चाताप होत असल्याचं म्हटलं होतं. त्यामुळे भाजपा आणि राष्ट्रवादीमधील संघर्षाची चांगलीच चर्चा झाली. या घडामोडींवर आता उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मोठं वक्तव्य केलं आहे.

पुण्यातील भाजपा आणि राष्ट्रवादीतील वादाबाबत बोलताना अजित पवारांनी सूचक इशारा देताना म्हटलं की, 'आपण गरज पडल्यास दिल्लीत जाऊन चर्चा करू.' भाजपा नेत्यांनी केलेल्या टीकेनंतर अजित पवारांनी हे मोठं वक्तव्य केल्यामुळे पुण्यातील भाजपा आणि राष्ट्रवादीतील वाद दिल्लीत जाणार? अशा चर्चा सुरू झाल्या आहेत.



### • 'अजित पवारांनी युती धर्म पाळला नाही': फडणवीसांची खंत

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'मी युतीचा धर्म पाळला, पण अजित पवारांनी युती धर्म पाळला नाही. अजित पवारांनी जी वक्तव्यं केली ती वक्तव्यं मला पटलेली नाहीत. पण मी त्याचा प्रतिवाद केलेला नाही. या निवडणुकीत मी पहिल्या दिवशी पासून ठरवलं होतं की मित्र पक्षांवर टीका करणार नाही. ती मी केली नाही. दुसरं ठरवलं होतं की मी कुठल्याही नेत्यावर टीका करणार नाही. मुंबईत उत्तरं मी देतो. विकासावर बोललं नाही तर लोकांना हे वाटू शकतं की आम्ही दुर्बल आहोत. पुणे-पिंपरीत मी युतीचा धर्म पाळला. अजित पवारांनी युती धर्म नाही पाळला.'**


### अजित पवारांना सोबत घेतल्याचा पश्चाताप : रवींद्र चव्हाण

**उपमुख्यमंत्री अजित पवार हे भाजपासोबत कशापद्धतीने जोडले गेले, हे सर्वांना माहिती आहे. त्यांना सोबत घेण्याबाबत पुणे, पिंपरी-चिंचवडमधील पक्षाचे पदाधिकारी मला थोडा विचार करा म्हणून सांगत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही मी नेहमी खासगीत सांगायचो की थोडा विचार करावा. पण आता पवार यांना सोबत घेत असल्याचा पश्चाताप होत आहे, असं मोठं वक्तव्य रविंद्र चव्हाण यांनी केलं होतं.**

### ➤ मुख्यमंत्र्यांशी निवडणुकीनंतर चर्चा करू : अजित पवार

मुख्यमंत्री फडणवीस पुण्यात बोलताना म्हणाले की, अजित पवारांचा संयम ढळला, या प्रश्नांवर बोलताना अजित पवार म्हणाले की, 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं तसं मत असू शकतं. पण आता महापालिकेचं मतदान पार पडल्यानंतर मी त्यांच्याशी बोलेन.' अजित पवारांनी युती धर्म पाळला नाही, देवेंद्र फडणवीसांच्या या वक्तव्याबाबत बोलताना अजित पवार म्हणाले की, 'आम्ही त्याबाबत बोलू. तो आमच्या दोघातला प्रश्न आहे. आम्ही सरकारमध्ये जात असताना आम्ही त्यांच्या वरिष्ठांशी चर्चा करूनच गेलेलो आहोत. आम्ही खालच्या नेत्यांशी चर्चा केलेली नाही. त्यामुळे ज्यांच्याशी चर्चा करून आम्ही सरकारमध्ये सहभागी झालो, केंद्रात आणि राज्यात. त्यांच्याशी मी चर्चा करेन, म्हणजे राज्यात देवेंद्र फडणवीस आणि केंद्रातील प्रमुख, यांच्याशी आम्ही चर्चा करू.' 'देवेंद्र फडणवीसांनी जो मुद्दा उपस्थित केला, मी जर तुमच्याशी चर्चा करून या प्रक्रियेमध्ये आलेलो असेल तर, देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर चर्चा केल्यानंतर मला वरिष्ठांशी देखील (दिल्लीत) जाऊन चर्चा करावी लागेल. जर तसं वाटलं तर हा विषय तिथपर्यंत (दिल्लीपर्यंत) जाईल', असं मोठं वक्तव्य अजित पवारांनी केलं आहे.

## पैसे वाटपावरून दोन्ही राष्ट्रवादीत राडा!



वृत्तसंस्था । सांगली

महापालिका निवडणुकीत मिरज येथे पैसे वाटप सुरू असल्याच्या कारणातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन गटामध्ये वादावादीचा प्रकार घडला. यावेळी अजित पवार पक्षाचे आमदार इद्रिस नायकवडी यांचे आणि शरद पवार पक्षाच्या उमेदवारांचे कार्यकर्ते एकमेकांवर धावून गेले.आमदार इद्रिस नायकवडी यांचा मुलगा प्रभाग २० मधून निवडणूक लढवत असून त्यांच्याकडुन निवडणुकीत मतदारांना पैसे वाटप करण्यात येत असल्याचा आरोप शरद पवार पक्षाच्या उमेदवाराकडून करण्यात आला आहे. त्यानंतर मिरजेतल्या जवाहर चौक येथील आमदार इद्रिस नायकवडी यांच्या घरासमोर दोन्ही राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आमने-सामने आल्याने वादावादीचा प्रकार घडला. त्यामुळे काहीकाळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## थोडक्यात

### आपल्याला टप्पू मासा लागतो!

**पुणे ।** मनोज जरांगे पाटील यांनी या निवडणुकीत थेट उडी घेतली आहे. 'जे समाजाच्या आणि आरक्षणाच्या विरोधात गेले, त्यांना या निवडणुकीत धडा शिकवा',असे आवाहन त्यांनी मराठा बांधवांना केले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी राज्यातील सध्याच्या 'खिचडी' युतीवरही प्रहार केला. या निवडणुकीत कोणाची कोणासोबत युती आहे, हेच कळायला मार्ग नाही. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि कॉंग्रेस हे सर्व स्वार्थासाठी एकत्र आले आहेत. मग यांचा शत्रू कोण? तर सामान्य गोरगरीब जनताच ना? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. जिल्हा परिषदा, नगरपालिका अशा स्थानिक लेव्हलच्या निवडणुकीत मी पडतच नाही, आपल्याला टप्पू (मोठा) मासा लागतो, त्याला जर माज असेल तर तो माज मी उतरवलाच म्हणून समजा असंही यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

### सप्तश्रृंग गड घाटात १५ मार्चपर्यंत एकेरी वाहतूक

**नाशिक ।** साडेतीन शक्तीपीठापैकी एक असलेल्या सप्तश्रृंग गडावर जाणाऱ्या मार्गावरील वाहतुकीत मोठे फेरबदल झाले आहेत. नांदुरी ते सप्तश्रृंग गड या घाट मार्गावर सुमारे दोन महिने एकेरी वाहतुकीचे नियम लागू असणार आहेत. निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार एकावेळी एकाच दिशेने वाहतूक सुरू राहील आणि शेवटची गाडी पोहोचेपर्यंत विरुद्ध दिशेची वाहतूक थांबवलेली असेल. नांदुरी ते सप्तशृंग गड या साधारणत १० किलोमीटरच्या घाट मार्गावर काही टप्प्यात कॉंक्रिटीकरण व संरक्षक भिंत बांधणीचे काम प्रगतीपथावर आहे. हा रस्ता डोंगराळ घाटमार्ग असल्याने रस्त्याची अस्तित्वातील रुंदी मर्यादित आहे. तीव्र वळणे, चढ-उतार आणि मर्यादित दृश्यमानता असल्याने जिथे काम सुरू आहे.

# वंदे मातरम्‌ला विरोध करणाऱ्यांना पराभूत करा!

## • उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आवाहन

वृत्तसंस्था । छत्रपती संभाजीनगर

**वंदे मातरम्‌चा अवमान करणाऱ्या ओवेसी यांच्या पक्षास पराभूत करा. कॉंग्रेस आणि स्थगिती सरकारने छत्रपती संभाजीनगरचा विकास थांबवला. मुंबई नंतर त्यांनी या शहरात भ्रष्टाचाराची पेरणी केली. घरात बसून योजनेचे काम पूर्ण करता येत नाही. मुंबईत बसून येथील कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडून दिले आहे. त्यांना घरी बसवा, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. शहरातील टिव्ही सेंटर भागातील क्रीडा मैदानावर आयोजित शिवसेना उमेदवारांच्या प्रचार सभेत ते बोलत होते.**

छत्रपती संभाजीनगर हे नामांतर झाल्यापासूनची ही पहिली निवडणूक आहे. त्यामुळे भगव्याचा महापौर झाला पाहिजे. काही दिवसापूर्वी पर्यंत शिवसेना फक्त ठाण्यापुरती असल्याचे सांगण्यात येत होते.

मात्र, विधानसभेत ८० जागा लढवून ६० जागा निवडून आणल्या. चांद्यापासून बांद्यापर्यंत शिवसेना पसरली आहे. नगरपालिका निवडणुकीमध्ये ७० नगराध्यक्ष आणि १४०० नगरसेवक निवडून आले आहेत. आता सांगा खरी शिवसेना कोणाची असा सवाल (पान २ वर)



# 'अर्ध्या हिंदुस्थानला बुडवू'!

## पाकिस्तानच्या लष्करप्रमुखाची नवी धमकी

वृत्तसंस्था । इस्लामाबाद

**पहलगाममधील दहशतवादी हल्ला आणि भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तानने संबंध सुधारणे अपेक्षित होते. मात्र, शेजारील देश भारताच्या विरोधात सातत्याने विष ओकत आहे. पाकिस्तानचा लष्करप्रमुख फील्ड मार्शल आसिम मुनीरने पुन्हा एकदा भारताला धमकी दिली असून, मुस्लिम देशांच्या सुरक्षेच्या नावाखाली एक नवीन 'डिफेंस डॉक्ट्रिन' (संरक्षण धोरण) सादर केले आहे.**

**काय आहे मुनीरचा नवा प्लॅन?**

या नव्या धोरणांतर्गत पाकिस्तान मुस्लिम देशांशी आक्रमक संरक्षण आणि धोरणात्मक भागीदारी वाढवत आहे. यामध्ये शस्त्रास्त्रांचे मोठे सौदे, लढाऊ विमाने आणि क्षेपणास्त्रांची विक्री यांचा समावेश आहे. भारतीय गुप्तचर सूत्रांच्या मते, जगातील अनेक मुस्लिम देश पाकिस्तानच्या (पान २ वर)

# थांबायचं नाय आता थांबायचं नाय

## अजय गोगावलेंच्या आवाजातील गाण्यांना उमेदवारांची पसंती




वृत्तसंस्था । मुंबई

**मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारांचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला असून प्रचारासाठी शेवटचे दोन दिवस उरले आहेत.**

या काळात उमेदवारांनी घरोघरी भेटी, प्रचार रॅली, सोसायट्यांमध्ये बैठका या मार्गाने प्रचार केलाच, पण समाजमाध्यमांवरून सगळ्यात जास्त प्रचार सुरू होता. त्यात काही विशिष्ट गाणी या प्रचाराच्या रिल्समध्ये सतत ऐकायला मिळत होती. अजय गोगावले यांनी (पान २ वर)

# जळगावात शरद पवार गटाच्या युवक जिल्हाध्यक्षाचा तडकाफडकी राजीनामा!

वृत्तसंस्था । जळगाव

**जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधूम सुरू असताना, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) पक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष विश्वजीत पाटील यांनी तडकाफडकी राजीनामा दिला आहे. पाटील यांनी वैयक्तिक कारण पुढे करून पदासह पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला असला, तरी त्यामागे नेमकी काय राजकीय पार्श्वभूमी आहे, याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.**



विश्वजीत पाटील यांनी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटात सक्रीय झाल्यानंतर युवक कॉंग्रेसच्या माध्यमातून गेल्या पाच महिन्यात जिल्ह्यात युवक संघटन मजबूत करण्याचा प्रयत्न केला.

विविध आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग, संघटनात्मक बांधणी आणि स्थानिक पातळीवरील पक्ष वाढ यामुळे त्यांची ओळख एक प्रभावी युवक नेता म्हणून निर्माण झाली होती. असे असताना, त्यांनी अचानक दिलेल्या राजीनाम्याने राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांमधून सखेद आश्चर्य व्यक्त केले जात आहे. अनेक मातब्बर सोडून गेल्यानंतर शरद पवार गटाकडून सध्या संघटनात्मक मजबुतीवर भर दिला जात आहे. अशा परिस्थितीत युवक संघटनेतील जिल्हास्तरीय नेतृत्वाचा राजीनामा पक्षासाठी मोठे आव्हान ठरू शकतो, असे बोलले जात आहे.


आगामी काळात जळगाव जिल्ह्यात युवक नेतृत्वाची नवी फळी उभारण्याचे आव्हान राष्ट्रवादीच्या पक्ष नेतृत्वासमोर उभे राहणार आहे. दरम्यान, विश्वजीत पाटील यांनी आपल्या राजीनामा पत्रात पक्ष व नेतृत्वाबद्दल आदरभाव व्यक्त केल्याने त्यांनी कोणत्याही पक्ष विरोधी भूमिकेचा संकेत दिलेला नाही. त्यामुळे ते भविष्यात कोणती राजकीय भूमिका घेतात, पुन्हा सक्रिय राजकारणात (पान २ वर)

# मनमाड- इंदूर रेल्वे मार्गासाठी आणखी भूसंपादनासाठी अधिसूचना प्रसिद्ध

## शिंदखेडा, शिरपूर, नरडाणा ते थेट मध्य प्रदेश सीमेपर्यंतच्या २२ गावांतील जमिनी होतील अधिग्रहीत

वृत्तसंस्था । धुळे

मनमाड ते इंदूर दरम्यान उभारण्यात येणाऱ्या नवीन रेल्वे मार्गासाठी अखेर भूसंपादन प्रक्रियेला गती मिळाली असून, रेल्वे मंत्रालयाच्या मध्य रेल्वे विभागाने शिंदखेडा व शिरपूर तालुक्यातील नरडाणा ते थेट मध्य प्रदेश सीमेपर्यंतच्या २२ गावांतील जमिनीसाठी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. ही अधिसूचना आज (दि.१२) शासकीय राजपत्रात जाहीर करण्यात आली आहे.



**अधिसूचनेअंतर्गत येणाऱ्या जमिनीचे नकाशे व सविस्तर तपशील संबंधित व्यक्तींना सक्षम प्राधिकरणाच्या कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.**

या अधिसूचनेनुसार हा विशेष रेल्वे प्रकल्प मनमाड ते न्यू धुळे तसेच नरडाणा ते डॉ. आंबेडकर नगर दरम्यानचा नवीन रेल्वे मार्ग म्हणून ओळखला जाणार असून, एकूण ३०९.४३ किलोमीटर लांबीचा आहे. या मार्गांतर्गत महाराष्ट्रातील नाशिक व धुळे जिल्ह्यांसह मध्य प्रदेशातील बडवाणी, खरगोन, धार आणि इंदूर जिल्ह्यांचा समावेश आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जमीन संपादन करण्याचा केंद्र सरकारचा मानस स्पष्टपणे जाहीर करण्यात आला आहे.

अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे की, संबंधित जमिनीत स्वारस्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीला अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत हरकत नोंदविता येणार आहे. या हरकती लेखी स्वरूपात सक्षम प्राधिकरणाकडे सादर कराव्या लागतील. हरकतीत कारणे स्पष्ट नमूद करणे आवश्यक असून, संबंधित व्यक्तीस प्रत्यक्ष किंवा कायदेशीर प्रतिनिधीमार्फत आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येणार (पान २ वर)

# टीम इंडियाचा वर्ल्ड रेकॉर्ड!

## • भारत ३००+ धावांचा पाठलाग; जगात ठरला नंबर १ संघ

वृत्तसंस्था । वडोदरा

**भारतीय क्रिकेट संघाने न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात केवळ विजयच मिळवला नाही, तर एक मोठा जागतिक विक्रम आपल्या नावावर केला आहे. वडोदरा येथील बीसीए स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात ३०१ धावांच्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग करत भारताने वनडे क्रिकेटच्या इतिहासात नवी उंची गाठली आहे.**

एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात सर्वात जास्त वेळा ३०० किंवा त्यापेक्षा जास्त धावांचे लक्ष्य यशस्वीरित्या गाठणारा भारत हा जगातील पहिला संघ ठरला आहे. भारताने आतापर्यंत तब्बल २० वेळा हा पराक्रम केला आहे. या यादीत इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियासारखे दिग्गज संघ भारताच्या खूप मागे आहेत. वनडेमध्ये सर्वाधिक वेळा ३००+ धावांचा पाठलाग करणारे संघ: भारत: २० वेळा, इंग्लंड: १५ वेळा, ऑस्ट्रेलिया: १४ वेळा, पाकिस्तान: १२ वेळा, न्यूझीलंड आणि श्रीलंका: ११ वेळा अशा धावा केल्या आहेत.

## संपादकीय

### जागतिक व्यापारात नवे डावपेच

डोनाल्ड ट्रम्प यांच्या गेल्या कार्यकाळाचा अनुभव पाहता, अमेरिका बहुपक्षीय मंचावरून बाहेर पडेल किंवा जागतिक प्रशासकीय संस्थांना थेट आव्हान देईल, अशीच शक्यता अधिक वाटत होती. ट्रम्प यांचा कायम असा दावा राहिला आहे की, विद्यमान व्यापार करार हे अमेरिकेच्या विरोधात आणि इतर देशांच्या फायद्याचे आहेत. अशा परिस्थितीत अमेरिकेने २०२४ आणि २०२५ या वर्षांची आपली थकबाकी भरून काढणे आणि सुधारणांचा प्रस्ताव मांडणे, हे या संस्थेला वाचवण्याच्या दिशेने अमेरिकेने टाकलेले पाऊल असल्याचे प्रथमदर्शनी वाटते. मात्र, डब्ल्यूटीओला खिळखिळे करण्याचे धोरण केवळ रिपब्लिकन पक्षाचेच आहे असे नाही, तर जो बायडेन यांच्या प्रशासनानेही संस्थेच्या अपील विभागातील नियुक्त्यांवर सातत्याने नकाराधिकार वापरून ही संस्था निष्प्रभ करण्याचा प्रयत्न केला होता. अमेरिकेने आपल्या प्रस्तवात प्रामुख्याने ज्या मुद्द्यांवर बोट ठेवले आहे, त्यातील काही बाबी जागतिक स्तरावर चर्चेला पात्र आहेत. विशेषतः विकसनशील देश म्हणून स्वतःला घोषित करून त्या आधारे मिळणाऱ्या सवलतींचा विषय अत्यंत कळीचा बनला आहे. चीनसारख्या महासत्ता बनू पाहणाऱ्या देशाने दीर्घकाळ स्वतःला विकसनशील श्रेणीत ठेवून व्यापारात सवलती मिळवल्या, यावर अमेरिकेचा मुख्य आक्षेप आहे. चीनने आता या सवलती सोडण्याची तयारी दर्शवली असली तरी, यामुळे जागतिक व्यापार व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर जो परिणाम झाला आहे, तो भरून काढणे कठीण आहे. अमेरिकेचे म्हणणे असे आहे की, यापुढे विशेष सवलती केवळ सर्वात कमी विकसित देशांनाच मिळाव्यात. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बेकायदेशीर निर्यात अनुदाने किंवा सबसिडीचा. चिनी अर्थव्यवस्थेत भांडवल, वीज आणि पाणी यांसारख्या घटकांसाठी पडद्यामागून दिली जाणारी अनुदाने ही डब्ल्यूटीओच्या नियमांचे उल्लंघन असल्याचे अमेरिकेचे म्हणणे आहे. चिनी व्यवस्थेतील अपारदर्शकतेमुळे या अनुदानांची नेमकी माहिती जगासमोर येत नाही आणि त्याचा फटका इतर देशांतील उद्योगांना बसतो. अमेरिकेने यावर उपस्थित केलेले प्रश्न रास्त आहेत, कारण जोपर्यंत स्पर्धेचे मैदान सर्वांसाठी समान नसते, तोपर्यंत मुक्त व्यापाराला अर्थ उरत नाही. परंतु, अमेरिका ज्या पद्धतीने या सुधारणा लादू पाहत आहे, ती पद्धत चिंताजनक आहे. लोकशाही मार्गाने व्यापक आघाडी उभी करण्याऐवजी अमेरिका आपल्या अटींवर शासन संरचना बदलू पाहत आहे. त्यातही सर्वात धोकादायक बाब म्हणजे मोस्ट फेवर्ड नेशन अर्थात सर्वात पसंतीचा देश या संकल्पनेवर अमेरिकेने केलेला हल्ला. हा जागतिक व्यापाराचा पाया आहे. द्विपक्षीय वाटाघाटी करून ठराविक देशांना झुकते माप देण्याऐवजी, या तत्त्वामुळे जेव्हा एखादा देश आपले व्यापार नियम बदलतो, तेव्हा त्याचे फायदे सर्व भागीदारांना आपोआप मिळतात. ही व्यवस्था मोडीत निघाल्यास जागतिक व्यापारात अराजकता निर्माण होईल आणि त्याचा सर्वाधिक फायदा मोठ्या अर्थव्यवस्थांना, तर नुकसान गरीब देशांना होईल. भारतासाठी ही परिस्थिती दुहेरी आव्हानाची आहे. भारताने अमेरिकेच्या मनमानी धोरणांना विरोध केला पाहिजे, विशेषतः राष्ट्रीय सुरक्षा या नावाखाली लादल्या जाणाऱ्या सीमाशुल्कांविरुद्ध भारताने भूमिका घेणे आवश्यक आहे. त्याच वेळी, भारताला हे देखील स्वीकारावे लागेल की डब्ल्यूटीओमध्ये वारंवार नकाराधिकाराचा वापर केल्यामुळे जगातील अनेक देश बहुपक्षीय करारांपासून लांब जात आहेत. अमेरिकेच्या काही मागण्या लोकप्रिय ठरण्याची शक्यता असल्याने भारताला आपले धोरण अधिक लवचिक आणि मुत्सद्दी ठेवावे लागेल. शेवटी, जागतिक व्यापार संघटनेचा बचाव करणे हे केवळ नियमांचे पालन करण्यापुरते मर्यादित नसून, ते जागतिक आर्थिक स्थैर्यासाठी अपरिहार्य आहे. अमेरिकेच्या या नव्या पवित्र्याकडे सुधारणेची संधी म्हणून पाहायचे की विखंडनाची सुरुवात, हे येणारा काळच ठरवेल. अमेरिकेच्या आक्षेपांचा सर्वात मोठा फटका भारताला बसू शकतो, तो म्हणजे विकसनशील देशाच्या व्याख्येवरून. डब्ल्यूटीओमध्ये विकसनशील देशांना विशेष आणि भिन्न वागणूक मिळते.

# मुख्यमंत्र्यांच्या पत्नीने १५०० रुपयांत घर चालवून दाखवावे

## स्वराज्य शक्ती सेनेच्या उमेदवारांच्या प्रचाराप्रसंगी करूणा मुंडेंचे आव्हान

प्रतिनिधी | जळगाव

**लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रूपये देणाऱ्या महायुती सरकारकडून त्याचा प्रत्येक निवडणुकीत मोठा गाजावाजा केला जातो. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा त्यांच्या पत्नीला तेवढेच पैसे देते. त्यांनी त्या पैशांवर महिनाभर घर चालवून दाखवावे, असे थेट आव्हान करुणा मुंडे यांनी येथे दिले.**



महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वराज्य शक्ती सेनेकडून उभ्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत करुणा मुंडे यांनी सत्ताधारी महायुती सरकारवर जोरदार टीका केली. आपल्या परखड भाषणातून त्यांनी सरकारच्या विविध योजनांवर प्रश्न उपस्थित केले. विशेषतः ङ्गलाडकी बहीणफ योजनेवर त्यांनी केलेली टीका सभेचे लक्ष वेधून घेणारी ठरली. त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट आव्हान दिल्याने निवडणूक रणधुमाळीत नव्या वादाला तोंड फुटले आहे.

लाडकी बहीण योजनेचा उल्लेख करताना करुणा मुंडे यांनी या योजनेच्या वास्तवावर बोट ठेवले. लाडक्या बहिणींसाठी दरमहा १५०० रुपये दिले जात असल्याचे सांगितले जाते. मात्र, त्याच महिलांसाठी मूलभूत सुविधा जसे की शौचालयही उपलब्ध नाहीत, असा गंभीर आरोप त्यांनी केला. लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागते. त्यामुळे त्यांच्या रोजच्या मजुरीवर परिणाम होतो आणि प्रत्यक्ष हातात उरणारी रक्कम १५०० नव्हे तर हजार रुपयांपेक्षाही कमी राहते, असे त्यांनी नमूद केले. याच मुद्द्यावरून त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आव्हान दिले. मी देवेंद्र फडणवीस किंवा त्यांच्या पत्नीला १५०० रुपये देते; त्या रकमेतून त्यांनी एक महिना घर चालवून दाखवावे, असे जाहीर वक्तव्य करत त्यांनी सरकारच्या धोरणांवर तीव्र टीका केली.यावेळी करुणा मुंडे यांनी आर्थिक गैरव्यवहारांच्या मुद्द्यावरही जोरदार हल्ला चढवला. तिजोरीची चावी चांगल्या आणि प्रामाणिक लोकांच्या हातात द्या, चोरांच्या हातात ती आधीच दिली आहे, असा टोमणा त्यांनी सत्ताधाऱ्यांना लगावला. आपल्या भाषणात त्यांनी तब्बल ७० हजार कोटींच्या कथित घोटाळ्याचा उल्लेख करत सरकारवर गंभीर आरोप केले. इतका मोठा घोटाळा ज्यांनी केला, त्यांच्याच हातात आज तिजोरीची चावी आहे, असे म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर थेट निशाणा साधला. माझे सासरे, पती मंत्री होते. आणि आता माझी नणंदही मंत्री आहे. तरीसुद्धा मला दारोदार भटकावे लागत आहे. सत्ताधाऱ्यांच्या विरोधात बोलल्यामुळे तीनवेळा जेलमध्ये टाकण्यात आले, असा आरोप करूणा मुंडे यांनी केला. सत्ताधाऱ्यांना सत्तेचा माज किती आहे, हे त्यावरून सिद्ध होते. मात्र, या सगळ्याला न घाबरता आपण सत्ताधाऱ्यांच्या छातीवर उभे राहून राजकारण करायचे ठरवले आहे. म्हणूनच आज संपूर्ण महाराष्ट्रात फिरत असल्याचे त्या म्हणाल्या.

# भाजपमधून पुन्हा तीन पदाधिकाऱ्यांची हकालपट्टी

## पक्षविरोधी कारवाया केल्याने उचलला पक्ष शिस्तीचा बडगा

प्रतिनिधी | जळगाव

**महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षातील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आला आहे. सलग हकालपट्टीच्या निर्णयांमुळे भाजपमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. अवघ्या दोन दिवसांपूर्वी २७ पदाधिकारी व कार्यकर्त्यांची हकालपट्टी केल्यानंतर आता पुन्हा तीन पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आल्याने पक्षातील असंतोष अधिकच तीव्र झाला आहे.**

भाजपच्या अधिकृत प्रेस नोटनुसार, पक्षशिस्त, धोरणे व निर्णयांचे पालन न केल्याने तसेच कार्यपद्धतीमुळे पक्षाच्या प्रतिमेला व संघटनात्मक शिस्तीला बाधा पोहोचल्याचे निदर्शनास आल्याने ही कारवाई करण्यात आली. पक्षाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करून संबंधितांचे प्राथमिक सदस्यत्व तसेच त्यांनी भूषवलेली सर्व पदे तात्काळ रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हकालपट्टी करण्यात आलेल्यांमध्ये जिल्हा युवा मोर्चाचे उपाध्यक्ष अक्षय चत्रभुज सोनवणे, किशोर (श्रीकृष्ण) गोविंदा वाघ आणि देवयानी सुभाष चौधरी यांचा समावेश आहे. सलग होत असलेल्या कारवाईमुळे भाजपच्या स्थानिक संघटनेत नाराजीचे वातावरण पसरले आहे. अनेक कार्यकर्ते संभ्रमात असल्याचे चित्र आहे. शहरातील राजकीय वर्तुळात या घडामोडींवर जोरदार चर्चा सुरू आहे.

# स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त संकल्प दौड, पोस्टर स्पर्धा, परिसंवाद उत्साहात

प्रतिनिधी | जळगाव

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्वामी विवेकानंद अध्ययन व संशोधन केंद्र, मेरा युवा भारत व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त विद्यापीठात स्वदेशी संकल्प दौड, पोस्टर स्पर्धा व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. म.सु. पगारे हे होते. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, पत्रकार मनिष पात्रीकर, अभिषेक चवरे, डॉ.मनोज इंगोले आदी उपस्थित होते. यावेळी मनिष पात्रीकर यांनी, तार्किक विचाराने आणि अनुभवांतून स्वामी विवेकानंदांनी धर्माकडे पाहिले. अध्यात्माचा उद्देश्य हा एकात्मता शोधणे हा असून यातून आंतरिक शक्ती ही वाढत असते, असे सांगितले तर राजेंद्र नन्नवरे यांनी, धर्म आणि विज्ञानाच्या एकत्रीकरणातून समाजाची उन्नती होईल असे विवेकानंदांचे विचार होते. त्यामुळेच विवेकानंदांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव हा आईन्स्टाईन, जगदीशचंद्र बोस यांच्यासारख्या शास्त्रज्ञांवर दिसून येतो. जमशेदजी टाटा व स्वामी विवेकानंद यांच्या भेटीतून निर्माण झालेले इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स हे अध्यात्म व विद्यानाचे प्रारूप आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी प्रा.डॉ.म.सु. पगारे यांनी देखील मनोगत व्यक्त केले.

# विवेकानंदांचे विचार समाजातील सर्व घटकांसाठी प्रेरणादायी

## डॉ.पराग जहागिरदार यांचे प्रतिपादन; विवेकानंद महाविद्यालयात पार पडले व्याख्यान

प्रतिनिधी | जळगाव

**स्वामी विवेकानंदांचे विचार समाजातील सर्व घटकांसाठी प्रेरणादायी आहेत. युवकांनी विवेकानंदांच्या विचारांची कास धरल्यास नव्या भारताची उभारणी करणे सहज साध्य आहे. चारित्र्य संवर्धन, बल संवर्धन आणि ज्ञानसंवर्धन करून युवकांनी आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणावा, असे प्रतिपादन डॉ. पराग जहागिरदार यांनी केले.**



खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचालित स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त अण्णासाहेब डॉ.जी.डी. बेंडाळे स्मृती व्याख्यानांतर्गत स्वामी विवेकानंद आणि आजचा युवक या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सं.ना. भारंबे, जिल्हा विधी प्राधिकरणाच्या सदस्य व सहाय्यक लोकअधिरक्षक अ‍ॅड. शिल्पा रावेरकर, उपप्राचार्य प्रा. आर.बी. ठाकरे, पर्यवेक्षिका प्रा.स्वाती बऱ्हाटे, समन्वयक प्रा.उमेश पाटील, समितीचे अध्यक्ष प्रा.गणेश सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ.पराग जहागिरदार यांनी, भारताच्या उत्थानासाठी युवक हा केंद्रस्थानी आहे. शिक्षणामुळे जाणिव निर्माण होत असते व हीच जाणिव युवकांमध्ये जागृत झाली तरच देशाच्या कल्याणासाठी ते सज्ज होऊ शकतील. विवेकानंदच्या वैज्ञानिक दृष्टिकोनातील तत्त्वज्ञानामुळे भारताचे नाव जागतिक पटलावर प्रभावीपणे कोरले गेले. हाच दृष्टिकोन वर्तमानात भारतीय समाजात सामाजिक भान आणण्यासाठी होऊ शकेल, असे सांगितले. भारतीय समाजात सहिष्णुता व सर्वसमावेशकता हे घटक भारताला वेगळे बनविते. स्वामी विवेकानंद यांच्या या घटकांच्या प्रचारामुळे त्यांच्या जीवनाला नविन आयाम मिळाला असल्याचेही ते यावेळी म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.श्रद्धा पाटील यांनी केले. यशस्वीतेसाठी प्रा.हेमंत पिंपळे, प्रा.दीपक चौधरी, प्रा.संध्या महाजन, प्रा.संदीप वानखेडे, प्रा.पल्लवी फिरके, प्रा.स्वप्निल धांडे, प्रा.संदिप गव्हाळे, विजय जावळे, चेतन वाणी आदींनी परिश्रम घेतले.

## गोदावरी अभियांत्रिकीत गुणवंतांचा सत्कार

**जळगाव** - गोदावरी पॉलिटेक्निकच्या प्रथम वर्ष डिप्लोमा परीक्षेत आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग विभागात वृषिका माहुरकर, ललित पाटील उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

# जीएमसीच्या डॉक्टरांची राष्ट्रीयस्तरावर बाजी

## ॲसीकॉन-२०२५ मध्ये पटकावली पारितोषिके

प्रतिनिधी | जळगाव

**येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील शल्यचिकित्सा विभागाच्या पहिल्याच तुकडीने राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित ॲसीकॉन-२०२५ परिषदेत आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला आहे. या परिषदेत जळगावच्या डॉक्टरांनी विविध श्रेणींमध्ये सुवर्ण आणि रौप्य पदकांसह अनेक पारितोषिके जिंकून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.**




शल्यचिकित्सा विभागातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी सादर केलेले शोधनिबंध आणि पोस्टर्सना तज्ज्ञांकडून विशेष दाद मिळाली. विजेत्यांमध्ये फ्री पेपर सादरीकरणमध्ये डॉ.प्रियांका गुंटुकुला यांनी प्रथम, डॉ.अमेय नेहेते यांनी द्वितीय, डॉ.अभिनय जी, डॉ.शर्वरी कदम यांनी तृतीय तर पोस्टर सादरीकरणमध्ये डॉ.बिंदूश्री आर यांनी प्रथम पारितोषिक प्राप्त केले. ही परिषद शस्त्रक्रिया क्षेत्रातील देशातील सर्वात मोठी आणि महत्त्वाची परिषद मानली जाते. अशा राष्ट्रीय व्यासपीठावर प्रथमच सहभागी होणाऱ्या तुकडीने एकाच वेळी इतकी पारितोषिके मिळवणे, ही जळगाव जीएमसीसाठी ऐतिहासिक कामगिरी ठरली आहे. या यशाबद्दल अधिष्ठाता डॉ.गिरीश ठाकूर, उप अधिष्ठाता तथा शल्यचिकित्सा विभागाचे प्रमुख डॉ.मारोती पोटे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.संगीता गावित, डॉ.रोहन पाटील, डॉ.मिलिंद चौधरी, डॉ.समीर चौधरी यांच्यासह प्राध्यापकांनी कौतुक केले आहे.

# चार्जिंगसाठी लावलेल्या दोन्ही ई-बाईक पेटल्या

प्रतिनिधी | जळगाव

**बंगल्याच्या अंगणात चार्जिंगला लावलेल्या दोन ई-बाइक पेटल्या. त्यात दोन्ही दुचाकींसह एसी जळाला व कॉम्प्रेसरचा स्फोट झाला. ही घटना रविवारी पहाटे एमआयडीसी पोलिस ठाण्यामागे घडली. अग्निशमन विभागाला पाचारण करून आग विझवण्यात आली.**

एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या मागे व बालाणी रिसॉर्टजवळ बंगल्यात राहणारे अंकुश कदम हे शनिवारी रात्री कुटुंबासह वरच्या मजल्यावर झोपले होते. त्यांनी रात्री झोपताना अंगणात नेहमीप्रमाणे दोन ई -बाइक चार्जिंगला लावल्या होत्या. त्यातील एका ई -बाइकने पेट घेतला. तिच्या शेजारीच असलेली दुसरी इलेक्ट्रिक बाइकही जळाली.

आगीचे लोट उंच जात असल्याने भिंतीवर असलेल्या एसीच्या आऊट डोअरनेही पेट घेतला. काही क्षणातच त्यातील कॉम्प्रेसरचाही स्फोट झाला. पाठोपाठ आतील एसीलाही आग लागली. आगीमुळे बंगल्याच्या खिडकीच्या काचा फुटल्या व आतमध्ये असलेले फर्निचर व गादी पेटली. ई-बाईक अतिओव्हर लोड चार्जींग झाल्याने पेटल्या असाव्यात असा अंदाज व्यक्त होत आहे.

## पान १ वरुन

### थांबायचं नाय आता......

गायलेली गाणी आणि त्यातही 'थांबायच नाय आता थांबायच नाय' हे गीत प्रचाराच्या रिल्समध्ये आघाडीवर होते. काळाबरोबर निवडणुकीच्या प्रचारातही मोठे बदल झाले आहेत. एकेकाळी मोबाइल नव्हते, तेव्हा घरोघरी प्रचारावरच सगळी भिस्त होती. मात्र आता प्रचारासाठी समाजमाध्यम मोठे प्रभावी माध्यम बनले आहे. या माध्यमाचा उमेदवारांनी या निवडणुकीत पूर्ण क्षमतेने वापर केला. घरोघरी, गल्लोगल्ली केल्या जाणाऱ्या प्रचाराच्या अगदी चित्रपटाप्रमाणे ध्वनिचित्रफिती तयार केलेल्या दिसत असून त्याचा मतदारांवर चांगला प्रभाव पडत आहे. या ध्वनिचित्रफितींना काही विशिष्ट लोकप्रिय गाण्याची साथ मिळाल्यामुळे उमेदवारांनी स्वतःलाच हिरो बनवून टाकले आहे. प्रेरणादायी अशा गाण्यांची निवड याकरीता उमेदवारांनी केली आहे. तर काही उमेदवारांनी राहुल देशपांडे यांच्या आवाजातील 'ही वाट जरी वळणाची बळ येऊ दे हिमतीला रंग चढूदे झिंग चढू दे' या गाण्याला पसंती दिली आहे. काही उमेदवारांनी ङ्गमोठी लढाई रं लढू मातीसाठी रं गड्या मनगटाचं जोर लावूनफ हे गाणे वापरले आहे. हे गाणेही या काळात मोठ्या प्रमाणावर ऐकायला मिळते आहे.

### जळगावात शरद पवार......

दिसतात की विश्रांती घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकूणच, पाटील यांच्या राजीनाम्यामुळे जळगाव जिल्ह्यातील शरद पवार गटात निर्माण झालेली पोकळी कशी भरून काढली जाते. शरद पवार गट त्यावर कोणती रणनीती आखतो, यावर आगामी स्थानिक राजकीय समीकरणे अवलंबून राहणार आहेत.

### मनमाड-इंदूर रेल्वे......

आहे. या प्रकरणात शिरपूर येथील उपविभागीय अधिकारी यांची सक्षम प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आवश्यक वाटल्यास सक्षम प्राधिकरणाकडून पुढील चौकशी करण्यात येऊन हरकत मंजूर किंवा नामंजूर करण्याबाबत आदेश दिला जाणार असून, हा आदेश अंतिम राहणार आहे.

### वंदे मातरम्‌ला विरोध......

एकनाथ शिंदे यांनी केला. पतंग कट गई - शिवसेना उद्धव ठाकरे गटाने कोणाला उमेदवारी दिली, तर रशीद मामूला. मग त्यांना तुम्ही मतदान करणार का? हिंदुत्वाची साथ देणाऱ्यांसाठी ही धोक्याची घंटा त्यामुळे त्यांच्या मतात घट होत आहे. याचवेळी सभेच्या ठिकाणी दोन वेळा कटलेली पतंग लोकांना दिसली. ही कोणाची निशाणी आहे का? असे शिंदे यांनी विचारले. त्यावर 'जलील' असे उत्तर आले. त्याला तर 'जलील' करू असे म्हणत शिंदे यांनी 'पंतग कट गई' असे म्हणत 'एमआयएम'ची खिल्ली उडवली.

### 'अर्ध्या हिंदुस्थानला......

परमाणु छत्रछायेखाली येण्यास उत्सुक आहेत. जगात पाकिस्तान हा एकमेव अण्वस्त्रधारी इस्लामिक देश असल्याने, ज्या देशांना इस्रायल किंवा अन्य शत्रूंचा धोका आहे, त्यांना मदत करण्याचे आश्वासन मुनीरने दिले आहे. संरक्षण निर्यातीतून ८ अब्ज डॉलर्सची कमाई - मिळालेल्या माहितीनुसार, सौदी अरेबिया आणि पाकिस्तान यांच्यातील वाढत्या मैत्रीमुळे मध्य पूर्वेतील सत्तेचे संतुलन बिघडण्याची शक्यता आहे. पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक डार यांनी सांगितले की, जवळपास ८ मुस्लिम देश पाकिस्तानसोबत लष्करी सहकार्य करण्यास इच्छुक आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये पाकिस्तानला ८ अब्ज डॉलर्सच्या शस्त्रास्त्रांच्या ऑर्डर्स मिळाल्या असून, पुढील ५ वर्षांत हे लक्ष्य २० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे त्यांचे नियोजन आहे. भारतासाठी चिंतेची बाब - आसिम मुनीरने चिथावणीखोर विधान करताना म्हटले आहे की, 'येणाऱ्या काळात अर्ध्या हिंदुस्थानला घेऊन बुडू'. भारताच्या संरक्षण तज्ज्ञांच्या मते, पाकिस्तान आपल्या अंतर्गत आर्थिक कमकुवतपणाला लपवण्यासाठी अशा प्रकारे बाह्य विस्तारवादावर भर देत आहे. पाकिस्तानची वाढती लष्करी पोहोच आणि मुनीरची आक्रमक विधाने भविष्यात प्रादेशिक शांततेसाठी मोठा धोका निर्माण करू शकतात.

# रोटरी क्लबच्या जळगाव ग्रीनसिटीला चार्टर प्रदान

## संस्थापक अध्यक्षा धनश्री ठाकरे व नूतन पदाधिकाऱ्यांनी स्वीकारली सूत्रे

प्रतिनिधी | जळगाव

**रोटरी क्लबची शंभर टक्के पोलिओ निर्मूलन ही प्राथमिकता असून सेवाभावी कार्यांद्वारे समाजाच्या गरजा पूर्ण करतांना रोटरी क्लब ऑफ जळगाव ग्रीनसिटी सुद्धा स्वच्छ पाणी, शिक्षण आणि आरोग्य यासारख्या प्रमुख क्षेत्रात मूल्याधिष्टीत काम करेल, असा विश्वास रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० चे प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे यांनी व्यक्त केला.**



मायादेवी नगरातील रोटरी भवन येथे शनिवार (दि.१०) रोजी येथे नव्याने अकरावा क्लब म्हणून स्थापन झालेल्या रोटरी क्लब ऑफ जळगाव ग्रीनसिटीच्या संस्थापक अध्यक्षा धनश्री ठाकरे यांना कॉलर पिन व चार्टर प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे यांच्याहस्ते सुपूर्द झाले. यावेळी व्यासपीठावर सहप्रांतपाल सचिन जेठवाणी, रोटरी रॉयल्सच्या आयपीपी वर्षा रंगलानी, सचिव गणेश वर्मा, स्नेहा ज्ञानचंदानी, प्रांतपालांचे प्रतिनिधी पयोड बेहेडे यांची उपस्थिती होती. सोहळ्यात रोटरी ग्रीनसिटीचे मानद सचिव अ‍ॅड.अभय कुलकर्णी व सार्जंट अ‍ॅट आर्म्स म्हणून यशवंत महाजन यांना सुद्धा पदभार देण्यात आला.

यावेळी रोटरी क्लब ऑफ जळगाव ग्रीनसिटीच्या नूतन कार्यकारणीच्या विविध कमिट्यांच्या चेअरमन व नूतन कार्यकारिणीची घोषणा सुद्धा धनश्री ठाकरे यांनी केली. त्यात उपाध्यक्ष रत्नाकर पाटील, कोषाध्यक्ष डॉ.भावना चौधरी यांच्यासह माधुरी थोरात, कमलेश सोनवणे, इरफान पिंजारी, योगेश बिर्ला, भूषण जाधव, योगेश महाजन, हेमंत जोशी, अर्चना माळी, भूषण पाटील, सोनल पाटील, दीपक खडके, विजय मोरे, योगेश चौधरी, नितीन पाटील, प्रमोद पाटील, सावरिया ओझा, प्रवीण सपकाळे, अभिजीत पाटील, पूजा वाघ, समीर रोकडे, प्रवीण सपकाळे, डॉ.दीपक पाटील यांना प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे यांच्याहस्ते रोटरी सदस्यत्वाची पिन प्रदान करण्यात आली. सोहळ्यास रोटरीचे माजी प्रांतपाल डॉ.चंद्रशेखर सिकची, प्रेसिडेंट एन्क्लेव्ह चेअरमन जितेंद्र ढाके, सहप्रांतपाल संजय गांधी,रोटरी सेंट्रलचे अध्यक्ष जितेंद्र बरडे,रोटरी मिडटाऊनचे सचिव डी.ओ. चौधरी, रोटरी जळगाव ह्युमॅनिटीचे सचिव रितू रायसिंघाणी उपस्थित होते. प्रास्ताविक वर्षा रंगलानी यांनी तर सूत्रसंचालन डॉ.दीपक पाटील यांनी केले तर आभार उपाध्यक्ष रत्नाकर पाटील यांनी मानले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# धुळे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेची अवैध दारू वाहतुकीवर कारवाई

## स्थानिक गुन्हे शाखा व धुळे पथकाची संयुक्त कारवाई

प्रतिनिधी । धुळे

महानगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस अधीक्षक धुळे यांच्या सुचनेनुसार विशेष मोहीम हाती घेण्यात आली. त्यानुसार दि.११ रोजी पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांना प्राप्त गोपनिय माहितीच्या आधारे धुळे शहरातील देवपूर भागातील वडेलरोड येथे स्थानिक गुन्हे शाखा, धुळे पथकाने नाकाबंदी करुन, विद्याधन कॉलेजसमोर वडेल गावाकडुन धुळे शहराकडे मारोती सुझुकी चारचाकी वाहन क्रमांक-GJ/01-HN-5387 येत असल्याचे समजले. सदर वाहनास थांबवुन चालक स्वप्निल दिनेश मोरे, वय-३२ वर्ष, रा. महादेवपुरा, दोंडाईचा याचेकडे वाहनातील माल बाबत




विचारपुस केली असता त्याने संशयास्पद उत्तरे दिली. त्यामुळे वाहनाची तपासणी केली असता, २ लाख ६४० रुपये किमतीचे विदेशी दारू १९ बाटली, ८.२७.५२० रु. कि.ची देशी विदेशी दारु व चारचाकी वाहन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अशाप्रकारे धुळे महानगरपालिका निवडणुक पार्श्वभुमीवर विशेष मोहिम अंतर्गत विना परवाना देशी विदेशी दारुची चोरटी वाहतुक करतांना आरोपी स्वप्निल दिनेश मोरे, वय-३२ वर्ष, रा. महादेवपुरा, दोंडाईचा याचे तावे कब्जातील मारोती सुझुकी चारचाकी वाहन क्रमांक-GJ/01-HN-5387 मधुन एकुण २,२७,५२०/- रु. किंमतीची देशी विदेशी दारु आणि ६ लाख रु.किंची चारचाकी हस्तगत करुन, पश्चिम देवपूर पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र प्रोव्हीविशन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कामगिरी श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक धुळे, अजय देवरे, अपर पोलीस अधीक्षक धुळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी यांनी कारवाई केली.

**गोपनिय माहितीच्या आधारे धुळे शहरातील देवपूर भागातील वडेलरोड येथे स्थानिक गुन्हे शाखा, धुळे पथकाने नाकाबंदी केली असता वडेल गावाकडुन धुळे शहराकडे मारोती सुझुकी चारचाकी वाहनाची तपासणी केली असता, देशी विदेशी दारु व चारचाकी वाहन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

# दोन लाखांची लाच घेताना पोलिस कर्मचारी ताब्यात

प्रतिनिधी । शिरपूर

## धुळे एसीबीची थाळनेरमध्ये मोठी कारवाई




दोन लाखांची लाच स्वीकारताना धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने थाळनेर पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्याला ताब्यात घेतल्याची सूत्रांची माहिती आहे. हा सापळा सोमवार दि. १२ रोजी दुपारी यशस्वी करण्यात आला असलातरी या कारवाईत कुणा-कुणाचा सहभाग आहे? याबाबत सखोल कारवाई सुरू असल्याने अद्याप नावे समोर आलेली नाहीत मात्र एसीबीच्या कारवाईची व्याप्ती मोठी असल्याची सूत्रांची माहिती आहे.

**कारवाईची व्याप्ती वाढण्याची शक्यता**

एका प्रकरणात सहकार्य करण्यासाठी तीन लाख रुपयांची लाच मागण्यात आली होती मात्र तडजोडीअंती दोन लाख रुपये स्वीकारण्याचे ठरले मात्र तक्रारदाराने धुळे एसीबीकडे तक्रार दिल्यानंतर आधी लाचेची पडताळणी करण्यात आली व सोमवारी दुपारी सापळा रचण्यात आला. लाचेचा सापळा यशस्वी झाल्यानंतर संबंधित पोलिस कर्मचाऱ्याला ताब्यात घेण्यात आल्याची माहिती आहे मात्र लाच प्रकरणात नेमकी कुणा कर्मचाऱ्यावर कारवाई झाली वा आणखी या प्रकरणात कुणा-कुणाचा सहभाग असून त्यांनाही ताब्यात घेण्यात आले? याबाबतचा तपशील धुळे एसीबीने अद्याप जाहीर केलेला नाही. असे असले तरी कारवाईची व्याप्ती मोठी असल्याने सायंकाळी उशिरापर्यंत कारवाईचा तपशील कळू शकणार आहे. या कारवाईने मात्र पोलिस दलात मोठी खळबळ उडाली आहे. धुळे एसीबीचे पोलिस उपअधीक्षक सचिन साळुंखे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

## थोडक्यात

### पटेल विद्यालयात शिक्षणावर व्याख्यान

**शिरपूर ।** शहरातील आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात खेळ, आरोग्य व शिक्षण विषयावर संस्थेच्या सचिव रेषा पटेल, सीईओ डॉ. उमेश शर्मा, प्राचार्य पी. आर. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यान वर्गाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते नागपूर येथील डॉ. पंकज मुंडे उपस्थित होते. डॉ. पंकज मुंडे यांनी मानवी जीवनात खेळाचे महत्व, शिक्षण आणि खेळ यांचा सहसंबंध, खेळात माणसाने शरीराची जपणूक कशी करावी, खेळात माणूस करिअर कसं घडवू शकतो, विद्यार्थ्यांना खेळ आणि शिक्षण या विषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

### डांबर प्लांटमुळे आरोग्य धोक्यात

**शिंदखेडा ।** तालुक्यातील बाभळे शिवारात गट नं. १३२/२ मधील शेतजमिनीवर एका कंपनीतर्फे डांबर (हॉट मिक्स) प्लांट बेकायदेशीररीत्या सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कोणतीही बिनशेती परवानगी नसताना हा प्रकल्प सुरू झाल्यामुळे, नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत असल्याची तक्रार जिल्हाधिकारी गांच्याकने केली जाते. बाभळे गावालगत खासगी शेतजमिनीवर बेकायदेशीर डांबर प्लांट सुरू आहे. या जमिनीची कोणतीही बिनशेती परवानगी झालेली नाही. ग्रामपंचायतीने मएनओसीफकशी दिली, याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. या प्लांटच्या धूर आणि दुर्गंधीमुळे प्रशासनाने तात्काळ हा प्लांट बंद करावा, अशी मागणी आहे.

### बुडकी येथे रासेयो शिबिर

**धुळे ।** कवी बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व किविप्र संस्थेचे इंन्स्टीट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन, बोराडी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे शास्वत विकासासाठी युवक पाणलोट व्यस्थापन आणि पडीत जमीन विकासावर विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १३ जानेवारी पर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त मेजर. विजय पावरा, मेजर रवींद्र पावरा यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी कर्मवीर पथसंस्थेचे चेअरमन शशांक रंधे हे होते. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. विकास पाटील, उपप्राचार्य डॉ. कल्पेश वाघ, रासेया कार्यक्रम अधिकारी प्रा. पंकज पाटील व सहाय्यक कार्यक्रम अधिकरी प्रा. भुपेश पाटील उपस्थित होते.

# श्रीबडादादा फाउंडेशनतर्फे नायलॉन मांजाची होळी

प्रतिनिधी । तळोदा

**मकर संक्रांतीचा सण जवळ येत असताना तळोदा शहरात पतंगबाजीचा उत्साह वाढत आहे. मात्र, पक्षी आणि मानवांसाठी जीवघेणा ठरणारा नायलॉन मांजा वापरू नये, असा संदेश देण्यासाठी आज श्री. बडादादा फाउंडेशन सदस्य यांनी नायलॉन मांजाची होळी करून अनोखे आंदोलन केले.**

गेल्या काही वर्षांत नायलॉन मांजामुळे अनेक दुचाकीस्वारांचे गळे कापले गेल्याच्या आणि शेकडो पक्षी जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. प्रशासनाने या मांजावर बंदी घातली असली आहे. या पार्श्वभूमीवर, बडा फाउंडेशन आणि गल्लीतील तरुणांनी एकत्र येऊन स्वतःजवळील आणि परिसरातून नायलॉन मांजा एका ठिकाणी जमा केला आणि त्याची होळी



केली. ह्या संकल्पनेत गल्लीतील जेष्ठ भिकाभाऊ गुरव, सूरजभाऊ शिंपी आणि बडादादा फाऊंडेशनचे सदस्य रोहन कलाल, नयन पाटील, विनीत मोराणकर, कोहिनूर दातीर, स्वामी पाटील,निखिल गुरव, पवन गुरव ,संकेत पाटील, राजेश गुरव, रितेश देडगे, ललित पाटील इत्यादी सदस्य उपस्थित होते.

# धुळ्यात मतदारांना प्रभागनिहाय वोटर स्लीप वाटप

प्रतिनिधी । धुळे

धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीची प्रक्रीया अंतिम टप्यात आलेली असून धुळे महानगरपालिकेमार्फत प्रभाग निहाय वोटर स्लीप वाटप आयुक्त तथा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु झाली आहे.

धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने शहरातील प्रत्येक मतदाराला आपले मतदान केंद्र व मतदान कक्ष बुथ याबाबत अचूक



माहिती मिळावी तसेच मतदान प्रक्रिया सुलभ व्हावी या उद्देशाने महानगरपालिकेमार्फत मतदार स्लिप (वोटर स्लीप) घरोघरी वाटप करण्यासाठी कर्मचारी पथकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यात वसुली विभागातील १९ लिपीक तसेच स्वच्छता विभागातील प्रभागातील एकूण ३० मुकादम तसेच सुमारे १३० आशा वर्कर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यांच्या मार्फत घरनिहाय वोटर स्लीप वाटपाचा कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. सदर पथकामार्फत घरभेटीची व वितरणाची नोंद ठेवून दैनंदिन अहवाल सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. तसेच यासाठी नोडल अधिकारी म्हणून प्र. वसुली अधिक्षक मुकेश अग्रवाल व स्वच्छता निरीक्षक विकास साळवे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तसेच मतदारांना मतदान केंद्र व बुथ निहाय माहिती राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# प्रभागनिहाय केंद्रांवरच होणार मतदान

प्रतिनिधी । धुळे

**धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी दि. १५ जानेवारी गुरुवार रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या कालावधीत प्रभागनिहाय असलेल्या मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. सदर निवडणूका मुक्त व निर्भयपणे होणेसाठी प्रशासना मार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.**

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रांवर मतदारांना आपली ओळख पटविण्यासाठी नियुक्त मतदान अधिकाऱ्यांकडे ओळखीचा पुरावा सादर करावा लागणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे मतदारांना ओळखीचा पुरावा म्हणून ग्राह्य असलेल्या फोटो असलेले मतदान कार्ड, निवडणूक ओळखपत्र, भारताचा पासपोर्ट, आधार ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना, आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र, केंद्रशासन, राज्य शासन, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहित दिलेली ओळखपत्रे, राष्ट्रीयकृत बँका अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराचे फोटो असणारे पासबुक, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखालील, फोटो असलेले ओळखपत्र (मनरेगा - जॉब कार्ड), निवृत्त कर्मचाऱ्यांचे अथवा त्यांच्या विधवा, अवलंबित व्यक्ती यांची फोटो असलेली निवृत्ती वेतन विषयक कागदपत्रे उदा. पासबुक, प्रमाणपत्र इ., लोकसभा, राज्यसभा सचिवालय तसेच विधानसभा, विधानपरिषद सचिवालय यांनी आपल्या सदस्यांना दिलेले अधिकृत ओळखपत्र, स्वातंत्र्य सैनिकांचे फोटो असलेले ओळखपत्र, केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा योजनेचे फोटोसहित कार्ड इ. १३ प्रकारचे पुराव्यांपैकी कोणतेही एक पुरावा सादर करावा लागेल.तरी मतदारांनी याबाबत मतदान केंद्रांवर होणारी गैरसोय टाळण्यासाठी सदर पुरावा सादर करावा असे आवाहन धुळे महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेले आहे.

### प्रचाराच्या तोफा आज थंडावणार

**धुळे** - महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता मा. राज्य निवडणूक आयोग यांनी निश्चित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार उमेदवारांचा प्रचाराचा कालावधी दि.१३ रोजी सायं.५.३० वाजता संपुष्टात येत आहे. प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही प्रकारचा जाहीर प्रचार जसे की सभा, मिरवणूक, पदयात्रा, ध्वनिवर्धकाचा वापर, प्रचार साहित्याचे वितरण तसेच मुद्रित, इलेक्ट्रॉनिक व समाजमाध्यमांद्वारे थेट किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात प्रचार करणे पूर्णतः प्रतिबंधित राहील. मतदान समाप्तीच्या ४८ तास अगोदर जाहीर प्रचार तसेच जाहिरात प्रसिद्धी, प्रसारणावर निर्बंध लागू राहतील. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणुकीत प्रचारासाठी धुळे महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरून आलेले राजकीय नेते, कार्यकर्ते व इतर व्यक्तींनी जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर धुळे महानगरपालिकेच्या हद्दीत वास्तव्य करू नये. कोणत्याही व्यक्तीला एखाद्या मतदान क्षेत्रातील कोणत्याही निवडणुकीतील मतदान समाप्तीच्या ४८ तास अगोदर, त्या मतदान क्षेत्रात सार्वजनिक सभा बोलविता, भरविता येणार नाही किंवा अशा सभेला हजर राहता येणार नाही.

# तळोद्यात भाजप-शिवसेनाची युती शहर विकासाच्या मुद्यावर एकत्र

प्रतिनिधी । तळोदा

**तळोदा नगर परिषद निवडणुकी नंतर भाजपा व शिवसेना शिंदे गटाचा नगरसेवकांनी बैठक घेऊन युती करण्यात आली शहर विकासाचा मुद्द्यावर नैसर्गिक युती आणण्याचा बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.**

तळोदा नगर परिषदेत निवडणुकीत महायुतीचे घटक पक्षात लढत होती. राष्ट्रवादी (अ. प.) पक्षाला नगराध्यक्ष व अकरा नगरसेवक तर शिवसेना शिंदे गटाला सहा जागा,



भाजपाला चार जागा मिळविल्या होत्या.

तळोदा शहराच्या विकासासाठी विधानपरिषद सदस्य आमदार चंद्रकांत रघुवंशी, शहादा मतदार संघाचे आमदार राजेश पाडवी व अक्कलकुवा मतदार संघाचे आमदार आमश्या पाडवी यांच्या नेतृत्वात व वरिष्ठ नेत्यांच्या आदेशान्वये नगरपरिषद निवडणूक पश्चात शहर विकासाच्या मुद्द्यावर एकत्रित येण्यासाठी व चुकीच्या गोष्टींना विरोध करण्यासाठी भाजप - शिवसेनाची नैसर्गिक युती अस्तित्वात आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शहादा तळोदा मतदार संघाचे आमदार राजेश पाडवी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय जाहीर करण्यात आला.

# तळोदा येथे मराठा समाजाकडून राजमाता जिजाऊ जयंती साजरा







**जिजाऊ मासाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्ताने धुळे महानगरपालिका सभागृहात पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे मुख्य एक अधिकारी बाळासाहेब तट्टू, उपायुक्त मनोज वाघ, कार्यालय अधीक्षक संजय मोरे, लेखापाल चंद्रकांत मोरे, निखिल टकले, बाळू मंगेडकर, कमलेश सोनवणे, प्रकाश सोनवणे, मोहनीश पाटील तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**

# वयोवृद्ध माता-पित्यांसोबत राहणाऱ्या संयुक्त कुटुंबाचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

प्रतिनिधी । तळोदा

मराठा समाजाच्या वतीने आदर्श मातृत्वाचे प्रतिक, छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणाऱ्या राजमाता जिजाऊ यांची जयंतीनिमित्त मराठा समाज परिवर्तन चळवळ, मराठा समाज प्रबोधन मंडळ, मराठा समाज महिला परिवर्तन चळवळ, मराठा समाज युवा परिवर्तन चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने सांस्कृतिक मिरवणूक काढून शहरातील माळी समाज मंगल कार्यालय येथे विविध उपक्रमातून राजमाता जिजाऊ जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मराठा समाजाकडून सकाळी ए.बी.सर्कल पासून ते माळी समाज मंगल कार्यालय पर्यंत सांस्कृतिक मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमास तळोदा नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा भाग्यश्रीताई चौधरी, श्यामभाऊ जाधव, कुकरमुंडाचे उपसरपंच भास्करराव कदमबांडे, सेलंबाचे व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष ईश्वर पवार, विश्वासराव मराठे, धनराज घेवारे, धुळे श्री संस्कार अनाथ व मतिमंद मुलींचे बालगृहाचे प्रमुख ह.भ.प.सुनिल वाघ, गुलाब मराठे, एन.डी.पाटील, जयश्री चौधरी, भावना कदम, ज्योती कदम, मराठा समाज महिला परिवर्तन चळवळीच्या अध्यक्षा ताराताई मराठे, संगिता मराठे, भारती कदम, रंजना पवार, हेमा रावडे, कल्पना जगदाळे, सविता कदम आदी मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमात तळोदा येथील नवनिर्वाचित नगराध्यक्षा भाग्यश्रीताई चौधरी, नगरसेविका शितल पाडवी, जयश्री महाले, प्रतिभा पाडवी, हर्षा पाडवी, गायत्री पिंपरे, लक्ष्मी नाईक, नगरसेवक कल्पेश चौधरी, अरविंद प्रधान तसेच जिल्ह्यातील मराठा समाजातील नवनियुक्त नगरसेवक रवि पवार नंदुरबार, सागर बोराणे शहादा आदींना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठा समाज परिवर्तन चळवळ व प्रबोधन मंडळाचे मुख्य समन्वयक विठ्ठल मराठे यांनी केले. यावेळी महिला जिल्हाध्यक्षा ताराबाई मराठे, सुनिल वाघ, सुभद्राताई मराठे, सारिका आव्हाळे आदींनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्याविषयी मनोगत व्यक्त केले.

मराठा समाजाला वसतीगृहासाठी जागेचे दान केलेल्या योगेश मोतीराम झिने यांचा सत्कार व जागेचे लोकार्पण करण्यात आले. तर आपल्या कुटुंबासाठी वयोवृद्ध मातापित्यांचा सांभाळ करत त्यांची सेवा करणाऱ्या संयुक्त कुटुंबाचा उल्लेखनीय, प्रेरणादायी कार्याची दखल घेऊन अशा एकत्र कुटुंबाच्या सदस्यांना मंडळाच्या वतीने राजमाता जिजाऊ जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनराज पाचोरे, राजेंद्र कूटे यांनी केले. तर आभार नंदराव कोते यांनी मानले. या कार्यक्रमाला परिसरातून मराठा बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मराठा समाज परिवर्तन चळवळ, मराठा समाज प्रबोधन मंडळ, मराठा समाज महिला परिवर्तन चळवळ, मराठा समाज युवा परिवर्तन चळवळीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**रॅलीने वेधले शहराचे लक्ष**

एबी सर्कलपासून गुलाबी थंडीत निघालेल्या समाजबांधवांच्या रॅलीने शहरवासीयांचे लक्ष वेधले. स्मारक चौकात रॅली आली असता सर्व समाजबांधवानी व्यसनमुक्तीची शपथ घेतली.

## विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली

### ● आमदार राजूमामा भोळेंचा घणाघात

प्रतिनिधी । जळगाव,

**महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सध्या जळगाव शहरात झंझावाती रॅलींचे आयोजन करण्यात येत आहे. प्रभाग क्रमांक १६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या भव्य प्रचार रॅलीदरम्यान आमदार राजूमामा भोळे यांनी विरोधकांवर जोरदार टीकास्त्र सोडले. महायुतीला मिळणारा जनतेचा प्रचंड प्रतिसाद आणि प्रचाराचा हा झंझावात पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे, असा घणाघात त्यांनी यावेळी केला.**

प्रभाग १६ मधील महायुतीचे अधिकृत उमेदवार वंदना संतोष इंगळे (१६ ब), रंजना विजय वानखेडे (१६ क) आणि सुनील वामनराव खडके (१६ ड) यांच्या प्रचारार्थ या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीची सुरुवात होताच कार्यकर्त्यांनी दिलेल्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. ठिकठिकाणी नागरिकांनी, विशेषतः महिलांनी उमेदवारांचे आणि आमदार भोळे यांचे औक्षण करून जंगी स्वागत केले.



#### ➢विकासकामांची हीच पावती : आ. भोळे

यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना आमदार भोळे म्हणाले की, आम्ही गेल्या काळात केलेल्या विकासकामांची पावती जनता आज रॅलीमध्ये दिसत असलेल्या अलोट गर्दीतून देत आहे. विरोधकांकडे कोणताही ठोस अजेंडा उरलेला नाही, त्यामुळे ते आता हतबल झाले आहेत. महायुतीचे सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

#### ➢महिलांचा सहभाग लक्षवेधी!

या रॅलीत महायुतीचे पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. रॅलीमध्ये महिलांचा उत्स्फूर्त सहभाग हे मुख्य आकर्षण ठरले. प्रभागातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आणि विकासाची गती कायम ठेवण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## प्रभाग क्र. २ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचा झंझावात

### नागरिकांचा उमेदवारांना वाढता प्रतिसाद

प्रतिनिधी । जळगाव





**शहर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्रजी पवार गट) यांच्या अधिकृत उमेदवारांचा प्रचार वेग घेत असून मतदारांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. प्रभाग क्र. २ (ड) मधून उत्तम रामभाऊ शिंदे, प्रभाग क्र. २ (ब) मधून रेखा भगवान सोनवणे तर प्रभाग क्र. २ (क) मधून पायल नवनाथ दारकुंडे हे अधिकृत उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत.**

उत्तम शिंदे हे माजी नगरसेविका गायत्री शिंदे यांचे पती आहेत. त्यांनी व माजी नगरसेवक नवनाथ दारकुंडे यांनी आपल्या कार्यकाळात केलेल्या विविध विकासकामांचा प्रभाव प्रचारात दिसून येत आहे. या विकासकामांच्या जोरावर रॅली, पदयात्रा तसेच होम टू होम प्रचार फेरी काढल्याने मतदारांनी उमेदवारांना उत्स्फूर्त पाठिंबा दिला. काळेनगर, शिवाजीनगर हुडको, हमालवाडा, पाटील गल्ली, मारवाडी गल्ली, उस्मानिया पार्क, बारसे कॉलनी, प्रजापतनगर, हरिओमनगर, कांचननगर, मोगल गार्डन, टीचर कॉलनी, ख्रिश्चन कब्रस्तान, दालफड आदी परिसरांत उमेदवारांनी घरोघरी जाऊन मतदारांच्या भेटी घेतल्या. यावेळी ज्येष्ठ नागरिकांचे आशीर्वाद घेत परिसराच्या सर्वांगीण विकासाचे आश्वासन देण्यात आले. प्रभागातून भरघोस मताधिक्याने निवडून येऊ, असा विश्वास उमेदवार पायल दारकुंडे यांनी व्यक्त केला. पायल दारकुंडे ह्या माजी नगरसेवक नवनाथ दारकुंडे यांच्या कन्या आहेत. समाजसेवेचा वारसा पायल दारकुंडे यांना घरातूनच मिळाला आहे. माजी नगरसेवक नवनाथ दारकुंडे व माजी नगरसेविका गायत्री शिंदे यांनी प्रभागात केलेल्या विकासकामांच्या जोरावर विजय निश्चित असल्याचे मतदारांनी सांगितले. प्रभागातील प्रचार रॅलीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटासह उबाठा गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते.

## थोडक्यात

### बेलसवाडी येथे अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताह

**मुक्ताईनगर ।** बेलसवाडी येथे भव्य संगीतमय श्रीमद् भागवत कथा व हरिनाम अखंड हरिनाम सहकिर्तन सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. यात कथेचे वाचन हभप सदानंद महाराज शिरसागर धामणगाव बढे यांच्या मुखातून श्रवले जात आहे. या आधी दि.८ रोजी रामकृष्ण महाराज कोठे तर ९ रोजी ह.भ.प. दीपक महाराज निंभोरा सिम तसेच दि.१० रोजी ह.भ.प. दिनेश महाराज बोदवड, दि.११ रोजी ह.भ. प. वैष्णवीताई महाराज खिरोदा यांचे कीर्तन झालेले आहे व ह.भ.प.स्वप्निल महाराज गिरड ह.भ.प.जीवन महाराज नाळगाव बोदळ ह.भ.प सदानंद महाराज धामणगाव बढे यांचे कीर्तन होणार आहे.

### रासेयो हिवाळी शिबिरात मतदान जनजागृतीवर पथनाट्य

**रावेर ।** ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना चे हिवाळी संस्कार शिबिर प्राचार्य डॉ जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली विटवे येथे आयोजित करण्यात आले. या शिबिरात प्रा हेमंत बाविस्कर यांनी मतदान जनजागृती वर व्याख्यान दिले मतदार व लोकशाही ह्या नाण्याच्या दोन बाजू असून त्या भारताच्या उज्वल भविष्यात खूप महत्त्वाची कामगिरी पार पाडत आहेत. म्हणून प्रत्येकाने आपले नांव मतदार यादीत नोंदवून मतदानाचे पवित्र काम करावे असे सांगितले.

## प्रभाग २ मध्ये भाजपचे उमेदवार विजय बांदल यांच्या प्रचाराचा झंझावात

### काळे नगर, हरिओम नगरमध्ये मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । जळगाव




**आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २ (ड) व प्रभाग क्रमांक दोन (क) मधील उमेदवार पूजा विजय जगताप यांच्या प्रचाराने राजकीय वातावरण तापू लागले आहे.भारतीय जनता पक्षाचे प्रभाग २ (ड) चे अधिकृत उमेदवार विजय लक्ष्मण बांदल यांनी काढलेल्या रॅली व होम टू होम प्रचार रॅली तसेच शहरातील विविध प्रभागात झंझावाती पदयात्रा काढून मतदारांशी थेट संवाद साधला.**

या प्रचार दौऱ्यात भाजप - शिवसेना- राष्ट्रवादी काँग्रेस- रिपाइं महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत शक्तीप्रदर्शन केले.

विजय लक्ष्मण बांदल हे सामान्य रिक्षाचालक कुटुंबातील असून सामाजिक कार्यात अग्रेसर असल्याने परिसरातील मतदारांचा विश्वास त्यांनी जिंकला आहे. त्यामुळेच मतदारांचा कल त्यांच्या बाजूने असल्याची चर्चा प्रभागात आहे.

बांदल यांनी आपल्या सहकाऱ्यांसह प्रभागातील काळेनगर, शिवाजीनगर हुडको, हमालवाडा, पाटील गल्ली, मारवाडी गल्ली, उस्मानिया पार्क, बारसे कॉलनी, प्रजापतनगर, हरिओमनगर, कांचननगर, मोगल गार्डन, टीचर कॉलनी, ख्रिश्चन कब्रस्तान, दालफड या भागात घरोघरी जाऊन मतदारांच्या भेटी घेतल्या.

'घर-घर चलो' अभियानांतर्गत त्यांनी ज्येष्ठ नागरिकांचे आशीर्वाद घेतले आणि परिसराच्या विकासाचे आश्वासन दिले. या प्रचार फेरीत भाजपचे मंडल पदाधिकारी यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते या प्रचार रॅलीत सहभागी झाले होते.

## कोळंबे शाळेत बक्षीस वितरण, सांस्कृतिक कार्यक्रम

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**येथील सौ.तू.ल. कोळंबे प्राथमिक विद्यामंदिर या शाळेत बक्षीस वितरण व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. बालवाडी व प्राथमिक विभागाच्या चिमुकल्यांनी सादर केलेल्या विविध बहारदार गीतांनी उपस्थित पालक व श्रोत्यांची मने जिंकली.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. एकनाथराव खडसे होते. व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष नारायणराव चौधरी, सचिव डॉ.सी.एस. चौधरी, संचालक चंद्रशेखर बढे, रमेश खाचणे, समिती अध्यक्ष पुरुषोत्तम महाजन, महेश पाटील, प्रमुख पाहुणे पंकज पाटील, सेवानिवृत्त मुख्याध्यापक मोतीलाल जोगी, मुख्याध्यापिका चित्रा भारंबे, विकास चौधरी, नितीन भोंबे, स्मिता खर्चे आदी मान्यवर उपस्थित होते. सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर शाळेतील विविध स्पर्धा परीक्षा, क्रीड स्पर्धा विजेत्यांचे तसेच शासकीय क्रीडास्पर्धेत विजेत्या शिक्षिकांचे प्रमाणपत्र, ट्रॉफी बक्षीस देऊन मान्यवरांनी सत्कार केला. शाळेत शिक्षक राबवीत असलेले विविध उपक्रम आणि कार्यक्रमांमुळे विद्यार्थी घडत असतो. प्राथमिक शाळा ही आयुष्यभराची एक आठवण असते. प्रमुख पाहुणे म्हणून शाळेत शेतकरी व यशस्वी दुग्ध व्यावसायिक पंकज सरोदे यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले हे अत्यंत चांगली बाब आहे.

## चोपडा ज्येष्ठ नागरिक संघ पूरग्रस्तांसाठी निधी गोळा करण्यात अव्वल

### ● खान्देश प्रादेशिक विभागातर्फे जयदेव देशमुख यांचा गौरव



प्रतिनिधी । चोपडा

**खान्देशात वयोवृद्धांसाठी उल्लेखनीय कार्य करण्यात अग्रेसर असलेल्या चोपडा ज्येष्ठ नागरिक संघांचे सर्वत्र कौतुक होत असतांना आता पूरग्रस्तांना निधी रक्कम गोळा करण्यातही अव्वल नंबर आल्याने संघाचे अध्यक्ष जयदेव देशमुख यांचा नुकताच गौरव करण्यात आला आहे.**

खान्देश प्रादेशिक विभाग फेस्काम धुळे मध्ये पूरग्रस्त शेतकरी निधी सर्वात जास्त निधी (रक्कम) गोळा करून शासनाला जमा केल्याने खान्देश प्रादेशिक विभाग धुळे अध्यक्ष अरुण माळी यांनी चोपडा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष जयदेव देशमुख यांचा उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्रमाणपत्र शाल श्रीफळ देऊन यथोचित गौरव केला आहे.त्याच्या कार्याबद्दल त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## जे.टी.महाजन स्कूलचे सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेत यश

प्रतिनिधी । यावल



**एकलव्य ज्ञानवर्धिनी बहुउद्देशीय संस्था नागपूरद्वारा घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान परीक्षेत जे.टी. महाजन इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे.**

विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन व गट चर्चेतून शिकण्याची संधी मिळवण्यासाठी २०० गुणांच्या या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्ता व सातत्यपूर्ण अभ्यास आणि मेहनतीच्या जोरावर उत्कृष्ट कामगिरी करत शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला.

यामध्ये पहिल्या गटातून इयत्ता सातवीच्या सिद्धी प्रवीण झोपे हिने १७८ गुण प्राप्त करून पहिला तर भूमिका गणेश सोनवणे इयत्ता सहावी हिने १७६ गुण मिळवून दुसरा क्रमांक प्राप्त केला. इयत्ता पाचवीतील चिरायू अमोल इंगळे याने १७४ गुण प्राप्त करून तिसरा व नावीन्या प्रकाश बोरोले हिने १७२ गुण प्राप्त करून चौथा क्रमांक प्राप्त केला. तसेच गट क्रमांक दोन मधून इयत्ता नववीच्या भूमिका उमेश पाटील हिने १८० गुण प्राप्त करत पहिला क्रमांक, आठवीतील श्रेया दीपक धांडे हिने १७८ गुणांसह दुसरा तर रचना विजय नेहेते हिने १७६ गुणांसह तिसरा क्रमांक पटकाविला.

## डॉ.अमृताताई सोनवणे यांच्या नेतृत्वाला नागरिकांचा भरीव पाठिंबा...

विकास ही एक निरंतर प्रक्रिया आहे. जे विकास कार्य काल बाकी होते ते आज करावं लागेल आणि जे विकास कार्य आज झाले तर उद्या गरजेनुसार दुसरे विकास कार्य करावे लागेल. पण त्यासाठीही विकासाला काळानुसार उजाळा देण्यासाठी आणि विकासाचा पाया दिवसेंदिवस मजबूत करण्यासाठी गरज असते एका मजबूत नेतृत्वाची...आणि नेतृत्व म्हणजे केवळ आदेश देण नाही तर निर्णय क्षमतेने जनतेच्या समस्या ओळखून जनतेला विकासाचा मार्गावर घेवून जाण्याची योग्य कला आहे. योग्य नेतृत्व निर्णयक्षमता, वचनबद्धता, दुरदृष्टी, प्रेरणा, प्रामाणिकपणा आणि संवेदनशिलपणा या सहा गुणांनी निर्माण होतं. सामाजिक बांधिलकीचे हे सहाही गुण डॉ.अमृताताई सोनवणे यांना वारसा स्वरूपात त्यांचा पारिवाराकडूनच लाभले आहे. म्हणून महानगरपालिका निवडनुकीचा प्रचारा दरम्यान त्यांना ठिकठिकाणी उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

**प्रकाश क्षीरसागर**
(राजकीय विश्लेषक)

डॉ.अमृताताई सोनवणे यांना राजकीय व सामाजिक वारसा परिवारातूनच लाभले आहे अशी जळगावच्या विकासासंदर्भात प्रसारमाध्यमांद्वारे चर्चा करताना अनेक वेळा उल्लेख होताना दिसते.आणि हे सत्य देखील आहे. परंतु हे अर्धसत्य आहे. कारण त्याच परिवाराकडून; मग ते बाबा असोत आई-वडिल असोत की काका या संपूर्ण परिवाराकडून डॉ. अमृताताई सोनवणे यांना वैचारिक वारसा, संघर्षाचा वारसा, त्यागाचा वारसा, संघटन कौशल्याचा वारसा, प्रामाणिकपणाचा वारसा, सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा वारसा, जनतेचा विकासाचा वारसादेखील लाभला आहे. आणि याची जाणिव प्रभागा क्र. ११ सोबत संपूर्ण जळगावकरांमध्ये प्रकर्षाने जाणवते...

कारण नेतृत्वाची खरी सुरूवात घरातूनच सुरू होते. आपले आई-वडिल हेच आपले पहिले नेते असतात.जे न बोलता शिकवतात न दाखवता प्रेरणा देतात त्यांच्या कृतीतूनच एक आदर्श उदाहरणाची निर्मिती करतात. यासोबत आई-वडिलांकडून शिकलेलं नेतृत्व हे सर्वांत मौल्यवान, अनुभवावर आधारित आणि मुल्यांवर आधारित नेतृत्व असतं. हे नेतृत्व फक्त सत्ता आणि प्रसिद्धीमुळेच नाहीतर प्रेम, जबाबदारी, योग्य निर्णय, आणि निस्वार्थ भावनेतून परिवाराचा सेवेची परंपरेला पुढे नेण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतं. डॉ. अमृताताई सोनवणे परिवाराचा याच सेवेची आणि विकासाची परंपरेला निरंतर पुढे नेतील अशी राजकीय वर्तुळा पाठोपाठ जनसामान्यांमध्ये विश्वास दिसत आहे. म्हणूनच प्रभाग क्र.११ मधून शिवसेनेचे नगरसेवक पदाचे उमेदवार म्हणून समवयस्कांसोबत प्रौढ नागरिकांचा स्नेहाचा,आपुलकीचा आणि आशिर्वादाचा रूपाने डॉ.अमृताताई सोनवणे यांना भरीव पाठिंबा दिसत आहे.

महानगरपालिका ही नागरी प्रशासन व्यवस्थेतील सर्वोच्च पातळीवरील रचना आहे. याठिकाणी शहराच्या विविध समस्यांवर चर्चा करणे, महापालिकेचा अंदाजपत्राचा मान्यतेविषयी योग्य निर्णय, आवश्यकतेप्रमाणे उपविधी (by Laws) तयार करणे, शहराच्या सांस्कृतिक व इतर महत्वाचा क्षेत्रांशी संबंधित निर्णय घेण्याची क्षमता असणे महत्वाचे मानले जाते. डॉ. अमृताताई सोनवणे या उच्चशिक्षित असून प्रभागातील समस्यांची सखोल माहिती घेवून उत्तम संवाद कौशल्याने धोरण ठरवून त्यांच्यामार्फत समस्या सोडवण्यासाठी लवकर मदत होईल अशी सर्वसामान्य नागरिकांमध्ये वार्तालाभ होताना दिसत आहे.

डॉ.अमृताताई सोनवणे यांची आमदार कन्या म्हणून जमेची बाजू असली तरी कुटुंबाचा वारसा जपत त्या स्वतःही अनेक सामाजिक कार्यांमध्ये सक्रीय आहेत. त्यांनी वैद्यकिय सेवेसोबत शिक्षण आणि क्रिडा क्षेत्रातही भरीव योगदान आहे.

डॉ.अमृताताई सोनवणे यांनी पतीसोबत त्यांच्या रूग्णालयाचा माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी तर गरजूंसाठी अनेकवेळा आवश्यक साहित्यांचे वाटप केले आहे. त्यांचे हे कार्य सामाजिक बांधिलकी जोपासणारे तर आहेच त्यांची ही संवेदशिलता सशक्त नेतृत्वाकडे वाटचाल करेल असा विश्वास प्रभागातील नागरिकांपाठोपाठ जळगावकरांमध्ये दिसत आहे. आणि हे डॉ. अमृताई सोनवणे यांना प्रभाग क्र.११ मधील नागरिकांनी दिलेल्या भरीव समर्थनामुळे जाणवते.

## पंकज विद्यालयात चारित्र्य, आत्मविश्वास, राष्ट्रसेवेचा संदेश देणारा जयंती सोहळा साजरा




प्रतिनिधी । चोपडा

**पंकज विद्यालय प्राथमिक राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक एम. व्ही. पाटील होते. यावेळी संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश बोरोले, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी जिजाऊंच्या व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्यावर आधारित मनोगत, प्रेरणादायी गोष्टी व भाषणे सादर केली. भार्गवी पाटील, लावण्या बाविस्कर, प्रांजल बोरसे यांची भाषणे प्रभावी ठरली. इयत्ता सातवी वर्गातील विद्यार्थिनिनी नृत्य सादर केले.

डी. एम. जैस्वाल व चंद्रशेखर चौधरी यांनी भाषणात सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांसारखा आदर्श राजा घडविणाऱ्या जिजाऊंचे मातृत्व ज्यांनी शिवरायांना शौर्य, सत्य, न्याय, राष्ट्र सेवेचे संस्कार घडविले आणि तरुणांना आत्मविश्वास, चारित्र्य व राष्ट्रभक्तीचा संदेश देणारे स्वामी विवेकानंदांचे विचार आजच्या विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक आहेत.

जिजामाता जन्मोत्सव प्रेरणादायी गीत तसेच स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे मनोगत ऐकून उपस्थितांची मने जिंकली. संपूर्ण कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कर्मचारीवृंद व इयत्ता सातवी वर्गातील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. त्यांना वर्गशिक्षक मयूर पाटील व धनश्री जावळे यांचे मार्गदर्शन मिळाले. सूत्रसंचलन श्रेया मोरे व थोरवी सोनवणे यांनी केले. आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय**

पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही. आर. पाटील व उपस्थित शिक्षकवृंद यांच्या हस्ते थोर विभूतींच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करून झाली.

कार्यक्रमात राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेत अनुष्का पाटील, प्रिया वऱ्हाडे, स्वरांजली साठे, सिद्धी कोळी, अनन्या पाटील व ऐश्वर्या पाटील या विद्यार्थिनींनी प्रभावी सादरीकरण केले. यासोबतच स्वामी विवेकानंद यांच्या वेशभूषेत ललित पाटील या विद्यार्थ्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थी मनोगतात अनुष्का पाटील, रिद्धी कोळी, साक्षी सूर्यवंशी यांनी आपले विचार मांडले. विजया पाटील व उदय गुजर यांनी मनोगतातून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी. आर. सोनवने यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पौर्णिमा भादले, महेंद्र पाटील, अविनाश पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.